# पितृसत्ता नष्ट करा

प्रत्येक वीडियो, प्रतेकचर्चा- एकघाव।



# डिस्कशनक्लब

(चर्चासमूह) ला चालवण्यासाठी मार्गदर्शिका

तुम्हीलैंगिकमुद्द्यांवर वीडियोबनवायला सुरुवात केली आहे, आता वेळ आहे त्याविडीयोंचा वापर करण्याची. आमच्या पितृसत्तातोड़अभियानच्या मुख्यतः तीन पायऱ्या आहेत. 1.चिन्हांकित करा. 2.उजागर करा. 3. नेस्तेनाबूतकरा.

## चिन्हांकितकरा

तुम्ही बहुतेक प्रशिक्षणात सहभागी झाल्या असाल, या मुद्द्यांवर वीडियो सुद्धा बनवत आहात . यामुळे तुम्हाला हे "चिन्हित" करण्यास मदत मिळाली असेल किपितृसत्ताकशी काम करते. हेचिन्हितकरण्याची पात्रताचतीचाबीआहे, जिच्या माध्यमातून तुम्ही समजू शकता कि कशा पद्धतीने पितृसत्ता कुणाला अशक्ततर कुणाला सशक्त करत आहे. तुम्ही जसे-जसे वीडियोबनवत जाल तस-तसे तुम्हाला लक्षात येत जाईल किपितृसत्ता कुठे-कुठे आणि कशी-कशी कामकरते.

## उजागरकरा

तुम्ही तुमच्या विडीयो मधे जे प्रश्न उपस्थित केले आहेत, तुम्ही व्हाईस ओवर (VO) मधे जेविश्लेषणकेले आहे, म्हणजेच ते तुम्ही उजागर केले आहे. उजागर करण्याचा अर्थ आहे- पितृसत्ताच्या विषयी आणि पितृसत्तापासून प्रभावितसामाजकिरचणे विषयी गंभीर समझ निर्माण करणे. जेव्हा तुम्ही चर्चासमूहात वीडियोपाहत असाल आणि त्या मुध्यांवर चर्चा करत असाल, तेव्हा सुद्धा तुम्ही पितृसत्ताच्या समस्येला उजागर करत असाल.

## नेस्तेनाबूतकरा

समाजाच्या खोलवर रुजलेल्या पितृसत्ताला अवाहन देणे काही सोपे काम नाही, परंतु याचा अर्थ हा नाही कि असंभव आहे आणि आपण करणार नाहीत. आपण आशावादी आहोत कि आपल्यामधील सर्व इतक्या सक्षम आहात कित्या स्वतः आणि समुदायात छोटासा का असेना परंतु महत्वपूर्णबदल घडवू शकतील. परिवार आणि समाजाला समानता आणि न्यायाच्या दिशेने एकपाऊल का असेना, पण पुढे नेवू शकते. कोणत्याही समस्येच्या समाधाणासाठी सर्वात पहिले महत्वाचे आहे त्या समस्येला स्वीकार करणे,मग त्यावर चर्चा करणे आणि समझुन घेणे, जेणेकरून पर्याय शोधता येतील. आपल्या जीवनात आपल्याला जे बदल अपेक्षित आहेत ते कसे येतील, याची रणनीती बनवण्या साठीचा मंच आहे डिस्कशनक्लब (चर्चासमूह).

## डिस्कशनक्लब (चर्चासमूह) का

जसे कि आधी सांगितल्या प्रमाणे कि कोणतीही समस्या सोडवण्यासाठी तिला स्वीकारणे, तीत्यावर बात करणे गरजेचे आहे.ज्यामुळे बदल, विकल्प आणि समाधानाचे विचार करता येवू शकतील. डिस्कशनक्लब (चर्चासमूह)

एकअशी जागा असेल जेथे लैंगिक मुद्द्यांवर विडीयो दाखवले जातील आणि मुद्द्यावर चर्चा केली जाईल. शक्य उपायांवर चर्चा केली जाईल आणि आपण यासाठी काय करू शकतो, हे ठरवले जाईल.

## डिस्कशनक्लब (चर्चासमूह) ला कोण चालवेल आणि व्यवस्थापन करेल

ते सर्व CC ज्यांची लैंगिक मुद्द्यांवरील या अभियानात निवड झाली आहे आणि वीडियोवालंटियरने ज्यांना प्रशिक्षित केले आहे, ते डिस्कशनक्लब (चर्चासमूह) चेसंचालन करतील. 16 राज्यातील ७०  CCआपले-आपले समूह चालवतील. हि मार्गदर्शिकाएका समूहाला चालवण्यासाठी आपली मदत करेल.

## डिस्कशनक्लब (चर्चासमूह) तयार कसे कराल

निम्नलिखिततीनटप्प्यांच्या हिशोबाने आपण आपल्या डिस्कशनक्लब (चर्चासमूह)  तयार करून संचालन करू शकता. तीन टप्पे :-

**1. डिस्कशनक्लब (चर्चासमूह)च्यासदस्यांचीनिवड** : तुम्ही सर्व आप-आपल्या समूहाची निवड करण्यासाठी स्वतंत्र आहात. तरीही काही उदाहरण याप्रमाणे आहे :-

- फक्त गावांतील (SHG) स्वयंसहायतागटांच्या महिला.
- केवळ विवाहित महिला.
- महिलाआणि पुरुषांचा तयार असलेला समूह.
- केवळ किशोरवयीन मुलींचा समूह.
- केवळ किशोरवयीन मुलांचा समूह.
- किशोरवयीन मुला-मुलींचा आधीपासून तयार असलेला समूह.
- केवळ कॉलेज़च्या विध्यार्थींचा समूह.
- किंवा अशा पद्धतीचे अन्य समूह.

अशा पद्धतीच्या समुहाची बांधणी करा ज्यांच्या सोबत चर्चा घडवण्यात तुम्हाला जास्त योग्य वाटत असेल. समूहाची संख्या १० ते १५ मधली असेल. जर तुम्ही मोठ्या समूहाचे संचालन करण्यास सक्षम असाल तर मोठ्या समूहाची बांधणी सुद्धा करू शकता तरीही १८ पेक्षा जास्त सदस्यांची शिफारस आम्ही नाही करणार. कारण कि समूह जास्त मोठा असेल तर सर्वांना आपले म्हणणे मांडण्यास आणि अनुभवांचे कथन करण्यास पुरेसा वेळ आणि अवसर भेटू शकत नाही.

समूह असा असावा जो कमीतकमी २ किंवा ३ महिन्यात एक वेळा २ तासांकरिता एकत्रित भेटतील. आपण गठीत केलेला समूह नियमित असावा म्हणजेच हाच समूह सर्व चर्चांमध्ये सहभागी असेल. पितृसत्ताविषयी गंभीरता पूर्वक समज तयार करण्यासाठी हे गरजेचे आहे. **म्हणून प्रत्येक चर्चेसाठी तुम्ही वेगळा समूह नाही घेवू शकत.**

**2.जागेचीनिवड** : वीडियो चे प्रदर्शन आणि चर्चासत्र साठी योग्य जागेची निवड करणे खूप महत्वाचे आहे. एक अशी खोली निवडा जिथे पूर्ण समूह आरामात बसू शकेल. यासाठी तुम्ही आपले घर, ऑफिस, संस्था, किंवा समाज मंदिर ची निवड करू शकता. फक्त या गोष्टी ध्यानात ठेवा :-

- अशा जागेची निवड करा जिथे महिला सुरक्षित असतील आणि त्या उघडपणे बोलू शकतील. कुणाचा दबाव नसावा.
- ठिकाण समूहाच्या सदस्यांच्या घरांपासून जवळ असावे. म्हणजे खुप दूर नसावे.
- कार्यक्रम स्थळी लाईट ची सुविधा असावी, (प्लगपॉइंटवगैरह) जिथे तुम्ही आपला कैमेरा,टेबलेटचार्जकरू शकाल.
- काळा किंवा सफेद फळा तिथे असल्यास ई उत्तम, कारण काही अभ्यासांसाठी फाल्याची गरज पडेल.
- ठिकाण मोफत किंवा कमी दराचे असले पाहिजे.
- प्रत्येक चर्चेसाठी वेगवेगळी ठिकाणे निवडू शकता. फक्त काळजी घ्या कि तिथे समूहाची हेळसांड होणार नाही. तुम्ही चर्चेचे नियोजन समूहातील सदस्यांच्या घरीही पाळी-पळीने ठेवू शकतात.

**3.बैठकांचीनिरंतरता** : समूहाला २-३ महिन्यात कमीतकमी एक वेळा भेटणे पूर्णपणे आवशक आहे. तुम्हा सर्वांना एक कैलेंडर दिले जाईल ज्यावर तुम्ही तुमच्या समूहाचे माषिक बैठकांच्या योजना आखू शकाल. प्रत्येक बैठक कमीतकमी २ तास चालेल.

जेव्हाही तुम्ही समूहाची आणि ठिकाणाची निवड करता तेव्हा लगेच आपल्या राज्य समन्वयक किंवा सरळ गोवाऑफिसला सूचित करा. एक यादी बनवा ज्यात निवड केलेल्या समूहातील सदस्यांचे नाव, वय, पत्ता स्पष्ट अक्षरात लिहा. हिसूचीआपले राज्य समन्वयक किंवा गोवा ऑफिस बरोबर सामायिक करा.

## डिस्कशनक्लब (चर्चासमूह) साठी आर्थिक तरतुदी

एका चर्चासत्रासाठी आपल्याला ३००० रुपये रक्कम दिली जाईल. आशा आहे कि तुम्ही येणाऱ्या १७ महिन्यात (नोव्हेंबर २०१७ पर्यंत) ३- चर्चा नक्की आयोजित कराल.

आम्ही सूचना करू इच्छितो कि समूहाच्या सदस्यांचा प्रवासखर्च करू नये म्हणजे आपला समुदाय व जवळपासच्या व्यक्तींची निवड करावी.

हे तुमच्या नियोजनावर अवलंबून आहे कि तुम्ही पैशांचा वापर कसा कराल, याविषयी आमच्याकडून कोणताही असा काही कडक नियम नाही.

जर तुम्ही आपल्या समूहासाठी आपणहून चहा, बिस्कुट ची व्यवस्था करू इच्छिता, किंवा चर्चासत्रासाठी स्टेशनरी (चार्ट, पेन, स्केचपेन, मार्कर, डस्टरइ.)खरेदी करीत असाल तर तुम्हाला ह्याच रकमेत नियोजन करावे लागेल. आमचा अंदाज आहे कि प्रत्येक चर्चासत्रासाठी ७०० किंवा १००० रुपये पेक्षा जास्त खर्च होणार नाही. म्हणजे २००० रुपये आपल्या वेळेसाठी आणि संयोजनासाठी वाचवू शकता.

## चर्चासत्राचे संयोजन कसे कराल

**चर्चेसाठी विषयाची निवड :** लैंगिकमुद्द्यांवरील सर्व विडीयो, विषय आणि उपविषयानुसार श्रेणीबद्ध केली गेली आहेत. तुम्ही तुमच्या जेन्डर प्रोजेक्टफील्डगाइड मधे पहाल कि कथाकल्पना सुद्धा वेगवेगळ्या विषय आणि उपविषयानुसार श्रेणीबद्ध केलेली आहेत.

- प्रत्येक २ महिन्यात तुम्हाला गोवा ऑफिस कडून पेनड्राइव मधे काही विडीयो दिले जातील, जे विषय/उपविषय सूचीबद्ध केलेले असतील. म्हणजे पेन ड्राइव मधे विषयवउपविषयचे फोल्डर असतील. मधे त्याच विषयाचे आणि उपविषयाचे व्हिडियो असतील.
- तुम्हाला जे विडीयो भेटतील ते वेगवेगळ्या CC द्वारा बनवलेले विडीयो असतील. म्हणजे त्यात तुम्ही लैंगिक मुद्द्यावर विडीयो बनवला नसेल तरीही तुम्ही चर्चासत्र घेवू शकता.
- प्रत्येकचर्चेमधे २ किंवा ३ उपविषयांची निवड चर्चेसाठी करू शकता.
- चर्चेसाठी योग्य उपविषयाची निवड करणे आवश्यक आहे. उपविषयाची निवड या गोष्टीवर निर्भर करते कि तुमच्या समूहाची रचना आणि गरजा काय आहेत. उदाहरण द्यायचे झाले तर-तुमच्या समूहात फक्त पुरुष आहेत काय, किशोरवयीन मुली आहेत, महिला-पुरुषांचा तयार समूह इ. ते विषय निवडा जे तुम्हाला समूहासाठी महत्वाचे वाटतील.

**चर्चेची तयारी :** कृपया करून कोणतीही चर्चा पूर्वतयारी शिवाय करू नये. तुम्ही ह्या सोप्या पद्धतीने चर्चासत्राची तयारी करू शकता :-

- जे वीडियो दाखवायचे आहेत ते आधी स्वता बघा. एका-एका विडीयो ला कमीतकमी ४-५ वेळा बघावे, त्यामुळे तुम्हाला हि जाणीव होईल कि विडीयो चा महत्वाचा मुद्दा आणि पैलू कोणता आहे.
- फील्डगाइड च्या सुरुवातीचे काही पाने जरूर वाचा. खासकरून भीती काय आहे आणि पितृसत्ता काय आहे इत्यादि
- ज्या उपविषयावर चर्चाआयोजितहोनार आहे, त्या उपविषयाच्या स्टोरीआइडियाहा भाग वाचा.
- जे वीडियो दाखवण्याचे आपले नियोजन आहे त्या **चर्चेचेटिपण (डिस्कशननोट)** जरूर वाचा. हे तयारी साठी सर्वात महत्वपूर्ण आहे.
- वीडियोला आपल्या टेबलेट मधे ट्रांसफर (स्थानांतर) करा आणि चांगल्या प्रकारे तपासून घ्या कि विडीयो योग्य पद्धतीने चालत आहे कि नाही.
- जर तुमच्या टेबलेट मधे जागा उपलब्ध नसेल तर होवू शकते कि तुम्हाला मेमोरीकार्डची गरज पडेल. किंवा आवाज़ वाढवण्यासाठी वेगळ्या स्पीकर ची गरज पडू शकते. आजकाल कमी किमतीचे ५०० रुपयांमध्ये नवीन स्पीकर विकत मिळतात.
- आपला कैमेराआणि टेबलेट पूर्णपणे चार्ज आहेत कि नाही हे तपासून घ्या.
- चार्ट, पेन इत्यादी तयार ठेवा.

**चर्चेसाठी टिपण (डिस्कसननोट) :** जोवीडियो तुम्ही दाखवणार आहात, त्यावर चर्चेचे सूत्रसंचलन करायला तुम्हाला मदत होईल.

- याजेंडरप्रोजेक्टअंतर्गत जेव्हडे विडीयो आहेत त्या सर्वांचे वेगवेगळे चर्चेसाठी टिपण (डिस्कसननोट) आहे.
- या मार्गदर्शिका बरोबरो १० डिस्कशननोट आहेत बाकी आपल्याला विडीयो बरोबर पाठवण्यात येतील. तर जेव्हाही तुम्हाला नवीन विडीयो मिळेल तेव्हा त्या विडीयो चीडिस्कशननोटसुद्धा मिळेल.
- प्रत्येक डिस्कशननोट च्या वरच्या भागात विषय आणि उपविषय स्पष्टपणे लिहिले आहेत. जेव्हा तुम्हाला नवीन डिस्कशननोट मिळेल तेव्हा ते विषय आणि उपविषयाच्या नुसार आयोजित करा
- प्रत्येक डिस्कशननोट मधे वीडियोचे वर्णन,सराव जो चर्चेच्या वेळी कराल, समूहाला विचारले जाणारे प्रश्न इत्यादी समाविष्ट आहे.
- आम्हाला विश्वास आहे कि डिस्कशननोट वाचल्यावर तुमच्या मनात खूप काही प्रश्न उठतील. त्या प्रशांना लिहून घ्या आणि समूहात ते उचला त्यामुळे चर्चा अधिक अर्थपूर्ण होईल.
- चर्चा चालवण्यासाठी तुम्ही स्वताही काही सरावांचा विचार करू शकता.

**अहवाल :** तुम्ही डिस्कशनक्लब ची प्रत्येक बैठकीवर एक संक्षिप्त अहवाल आम्हाला पाठवा. अहवालात ह्या निम्नलिखितगोष्टी समाविष्ट करा:-

- तुमचे नाव, जिल्हा, राज्य आणि अहवाल पाठवण्याची तारीख.
- डिस्कशनक्लबच्या बैठकीची तारीख आणि ठिकाण.
- सदस्यांची सूची, नाव, वय, पत्ते आणि त्यांच्या स्वाक्षऱ्या.
- **फोटोः** तुम्ही तुमच्या केमेराने फोटो सुद्धा काढून आम्हाला पाठवा.
  - प्रत्येक सदस्याच एक फोटो (CU/चेहराशॉट). पासपोर्टसाइज़फोटोप्रमाणे,औपचारिकफोटोकाढण्याची काही गरज नाही. फोटो चे नाव बदलून ज्या व्यक्तीचा फोटो आहे त्याचे नाव लिहावे.
  - आम्ही ते ठिकाणही पाहू इच्छितो जिथे तुम्ही बैठक करता आणि कशा पद्धतीने करता तोही अमुभव घेण्याची उत्सुकता आहे. बैठकीच्या शेवटचे ४-५ फोटो हि पाठवा, ज्यात समुहाचा ELS (माहौलशॉट), MS (आर्धा शॉट) आणि काही  CU (चेहराशॉट) हवे.
- **वीडियोः** आम्हाला पूर्ण चर्चा किंवा बैठकीचे वीडियोनाही पाहिजेत. काही यासारखे विडीयो पाठवा:-
  - एक२० सेकंदाचा शॉट ज्यामध्ये समूह विडीयो पाहत आहे.
  - एक २० सेकंदाचा शॉट ज्यात समूह चर्चा करतांना दिसेल.
  - काही सहभागींचे CU (चेहराशॉट) बोलतांना, चर्चा करतांना शॉट.

या मार्गदर्शिकेच्या शेवटी अहवालाचा मसुदा दिला आहे. त्याचा फोटो सरळ करून घ्या.चर्चे नंतर याला भरून फोटो आणि विडीयो सोबत राज्य समन्वयक (State Coordinator) किंवा सरळ गोवाऑफिसला पाठवा. ज्या दिवशी

बैठक त्याच दिवशी रिपोर्ट, फोटो आणि विडीयो हे सर्व व्यवस्थित करून पाठवावे. याच्यात तुमच्यासाठी हि सोयीचे होईल.

**आपले पेमेंट :** गोवाऑफिस मधे आपला अहवाल मिळताच लगेच आपले पेमेंट केले जाईल. तुमचे पेमेंट सरळ तुमच्या बँक खात्यात जमा केले जाईल.

# विषयः **महिलाचे काम, पुरुष चे काम**

## उपविषयः **लैंगिकछळ कोड**

वीडियोः**लैंगिकभेदभाव च्या आधारावर मुलांचे संगोपन** | CC :**अनिलकुमारसरोज** | **UID:** UP_1369

**नोट :** सुरुवात एका सरावातून करू.
**सरावासाठी सामुग्री :** कागद आणिपेन.

**सराव :** समूहाची छोट्या-छोट्या समूहात विभागणी करा.त्यानंतर समूहातील सदस्यांना एका स्री आणि एका पुरुषाच्या दिवसातील २४ तासांतील कल्पना करायला सांगा आणि दोघांच्या कामाची यादी बनवत जा. समूहाला सांगा कि स्री किंवा पुरुषाचे कोणतेही काम सुटू देवू नये. यादी निर्दोष बनवा.

( **नोट :** पहा कि यादी मधे महिलांचे सर्व काम समाविष्ट आहेत. मुलांना दुध पाजणे, शिवणकाम, साफ-सफाई, मुलांची काळजी घेणे इत्यादींचा सुद्धा कामात समावेश आहे. सहसा स्रीयांकडून केल्या जाणाऱ्या बहुतेक कामांना कामाच्या श्रेणीत ठेवले जात नाही. त्यानंतर पहा कि स्री आणि पुरुषाच्या दिवसात काय अंतर आहे, कामात काय अंतर आहे, कामाचे तास किती, कामाच्या वेळेश आरामाची काय स्थिती आहे. झोप किती मिळते, निर्णय घेणाऱ्या कामात कुणाचा किती सहभाग जास्त आहे. कामाचा दाब कुणावर किती आणि कोणत्या प्रकारचा आहे. या प्रश्नांच्या आसपास चर्चा घडवा. आणि सांगा कि सरावा द्वारे जे चित्र समोर आले आहे, त्याचे मूळ बालपणात आहे. आणि विडीयो दाखवा.)

**वीडियोचे वर्णन :** वीडियोतील मुख्य पात्र खुशबू आहे आणि सहपात्र तिचा भाऊ शनिआहे. ते दोन्ही एकाच परिवाराचे सदस्य आहेत. परंतु दोघांच्या परिस्थितीत दिवस-रात्र चे अंतर आहे. वीडियोच्या सुरुवातीला मुलाला काही कामांबद्दल विचारले जाते कि हे काम कोण करते, मुलगा सांगतो कि मुली करतात. मग खुशबू सांगते कि ती काय-काय काम करते. विडीयो मधे मुलाला सीसी विचारते कि तू स्वयंपाकघरातले काम का नाही करत. तो ह्या प्रश्नावर हसतो. खुशबू सांगते कि खेळण्यासाठी वेळ नाही, ना अभ्यासासाठी, नाही आराम करण्यासाठी. शेवटी ती म्हणते कि तीची डॉक्टर बनण्याची इच्छा आहे.

( **नोटः** जर तुम्हाला वाटले तर परत विडीयो पाहू शकता. अन्यथा चर्चेला सुरुवात करा. प्रश्न विचारा )

**प्रश्न : मुलांना कसे काय माहित पडते कि मुलाने काय काम केले पाहिजे आणि मुलीने काय?**
( **नोट**ः या प्रश्ना द्वारेत्या माध्यमांना शोधायचे आहे ज्याद्वारे मुलगा-मुलगी या विशेष पद्धतीने वाढवली जात आहेत. चर्चा या विषयावर केंद्रित राहील कि मुलाला कसे समजते कि मुलीचे काय काम आहेत आणि मुलाचे काय काम आहेत . हे कोण शिकवते आणि कसे शिकवते. चर्चा लैंगिक आधारावर कामाच्या विभाजनाच्या प्रशिक्षणावर होईल जे बालपणीच सुरु होऊन जाते. परंतु प्रशिक्षण शब्दाचा वापर आपण एक वेळाही करायचा नाही. चर्चा पुढे नेण्यासाठी पूरक प्रश्न विचारा.)

**पूरकप्रश्न :** अजून कोण-कोणत्या गोष्टी आहेत ज्यामुळे मुलांच्या मनात ह्या धारणा पक्क्या होतात?
( **नोट**ः उदाहरणार्थ अभ्यासक्रमात असे प्रस्ताव किंवा फोटो आढळतात जे या कल्पनांना अजून मजबूत करतात. जसे: मोहन शाळेत जातो. कमला कपडे धुते. जेव्हा तुम्हाला वाटेल कि चर्चा पुढे जात नाही आहे तर हे प्रश्न विचारू शकता.)

- **प्रश: मुलांना घरातील काम का केले जावू देत नाही?**
- **प्रश्न: काय याच्यात काही नुकसान सुद्धा आहे, का घर चालवण्यासाठी हे गरजेचे आहे?**
- **प्रश्न: मुलगा-मुलगी मधे या पद्धतीच्या कामाची विभागणी का केली गेली आहे?**
- **प्रश्न: काय हे फक्त मुलींसाठीच अमानवी आहे कि मुलांसाठी सुद्धा?**

( **नोट**ः जेव्हा तुम्हाला वाटेल कि त्याच गोष्टी पुन्हा होत आहेत तर सुरुवातीपासून विडीयो चालवा आणि १:०९ वेळेवर थांबवा जिथे मुले जेवण करत आहेत. समूहाला प्रश विचारा.)

**प्रश्न: काय ह्या चित्रात आपल्याला काही अस्वाभाविक बात वाटत आहे?**
( **नोट**ः दृष्यात मुले जेवण करीत आहेत. तिन्ही मुलांकडे दुध आहे आणि मुलीकडे दुध नाही. चर्चेला पुढे नेण्यासाठी पूरक प्रश्न विचारू शकता. )

**पूरकप्रश:-**

- **जर कामाच्या दृष्टीने पाहिले तर मुलीला जास्त दुध पाहिजे. परंतु दिले जात आहे मुलाला. आई-वडील असे का करतात?**
- **काय तुम्ही पण आपल्या मुलांबरोबर असे करता?**
- **काय बालपणी तुमच्याबरोबर हि असे घडले आहे?**

( **नोट :** मुलगा आणि मुलगी च्या पोषण संबंधातील सामाजिक व पारिवारिक कल(ट्रेंड) चर्चेत घ्या. त्यानंतर विडीयोला तिथूनच सुरु करा जिथे थांबवला होता. परत १:४५ वर थांबवा जिथे मुलगा आपले काम सांगत आहे कि तो सायंकाळी अभ्यास करतो आणि दिवसभर खेळतो. मुलीचे काम सांगतो आणि शेवटी सांगतो “बस”). प्रश्न विचारा-

**प्रश्न: मुलाने आपल्या कामाच्या पुढे "बस" नाही लावले, मुलीचे काम जास्त आहेत तरीही "बस' का लावले?**
( **नोटः** विडीयो ला तिथूनच सुरु करा जिथे थांबवले होते. आणि १:५० वर थांबवा जेथे मुलाला विचारले जाते कि तू स्वयंपाक घरातले काम का नाही करत, तर तो मजेदारपणे हसतो.) प्रश्न विचारा-

**प्रश्न: हा का हसला?**
(**नोटः** उत्तर एकाच वख्यात आले तर हस्तक्षेप करून चर्चा पुढे न्या. जसे कि- ठीक आहे आपण कल्पना करूया कि त्याच्या मनात काय चालत असेल. उदाहरण–त्याला वाटले कि हा काय प्रश्न आहे, हे तर सर्वांना माहित आहे कि स्वयंपाक घरातली कामे मुले नाही करत. त्यानंतर विडीयोला तेथूनच सुरु करा जिथे थांबवला होता आणि २:२१ वर थांबवा. मुलगी म्हणते कि तिला डॉक्टर बनायचे आहे. प्रश्न विचारा.)

**प्रश्न: काय खुशबू आपले स्वप्न पूर्ण करण्याच्या स्थितीत आहे?**
( नोटः कदाचित हि चर्चा ह्या विषयाच्या आसपास होईल कि गरीब परिवार आहे. होऊ शकते कि कुणी म्हणेल खुशबू गरीब आहे म्हणून डॉक्टर नाही बनू शकत. लक्षात असुद्या कि आपण गरिबी नाही तर संभावना वर बात करीत आहोत. तुम्ही हा पूरक प्रश्न विचारू शकता.)

**पूरकप्रश्न: समझा खुशबू कशी तरी डॉक्टर झाली तर काय तिला असा पती मिळेल जो तिला जेवण बनवण्यात, इतर घरातील काम करण्यात तिची मदत करेल.**

विषयः **स्रीचे काम, पुरुषाचे काम**

उपविषयः **लैंगिकभेदभाव कोड**

---

वीडियोः **बालपण,ओझे, बेपर्वाई** | **CC :ममतापात्रा** | **UID: OD_1185**

---

( **नोटः** बैठकीची सुरुवात सरावापासून सुरु करा. या सरावा दरम्यान फक्त बालपणावर चर्चा करा. आपण आपल्याकडून लिंगविषयी चर्चा करू नये. लिंग विषयी नाही, तर बालपणाविषयी बात करा. बालपणावर समूहतील सदस्यांची काय समझ आणि अनुभव आहेत ते जाणून घेण्याचा प्रयत्न करा. मोकळेपणाने चर्चेमधे येवू द्या. ) सरावासाठी सामुग्री: काळा फळा, खडू, डस्टर किंवा चार्टपेपरआणि स्केचपेन.

**सराव:** फळा किंवाचार्टपेपर वर दोन भाग करा.  पहिल्या भागात लिहा “बालपण”. त्यानंतर समूहातील सदस्यांना सांगा कि त्यांनी एका-एका शब्दात “बालपण” काय आहे ते मांडावे. तुम्हीही ते फळ्यावर किंवा चार्ट पेपर वर लिहित जा. त्यांनतर दुसऱ्या भागात लिहा “स्वप्नांचे बालपण” समूहाला त्यांच्या स्वप्नाच्या बालपणाची कल्पना करायला सांगा. प्रयत्न करा कि समूह “कल्पनारम्य” जणू आदर्श दुनियेत जातील. फुलपाखरू, फुगे, फुल, पक्षी इत्यादी चर्चा मधे यावेत. या सर्व शब्दांनाही फळ्यावर लिहित जावे.

(**नोटः** एक मानवी परिपूर्ती(उपलब्धी) समूहात निर्माण व्हावी त्यांना जाणीव व्हावी असा प्रयत्न करा. त्यानंतर सांगा कि चला बालपणा विषयीचा एक विडीयो पाहूया.)

**वीडियोचे वर्णन :-** वीडियोसुरु होतो. एक बाळ खुर्चीवर बसले आहे. हे विचारल्यावर कि मुले काय-काय काम करतात? सांगतो कि क्रिकेट खेळतात, जनावरांना चरायला नेतात, भात खातात आणि खुर्चीवर बसतात. एक मुलगी सांगते कि ती काय-काय काम करते. ती सांगते कि घराची सफाई करते, भात बनवते, जनावरांची काळजी करते,लहान बाळांना खावू घालते, जेव्हा विचारले जाते कि काय छोट्या बाळांना वडील खावू घालता का. मुलगी सांगते, नाही खावू घालत. अजून एक मुलगा सांगतो कि त्याच्या घरी मुली काय काय काम करतात. पाणी भारतात, शेतात जेवण देवून येतात अजून जेवण बनवतात. मुलगी सांगते कि ती जेवण बनवते, सर्वांना वाढते.तू जेवण केव्हा करते? हे विचारल्यावर ती सांगते, सर्वात शेवटी, जेव्हा सर्वांचे जेवून होते.

( **नोटः** लक्षात असूद्या कि विडीयो च्या पहिले आपण बालपणावर सरावसत्र घेतले आहे. सराव आणि विडीयो या एकमेकांत विरोधाभास होईल. कदाचित वीडियो नंतर आपो-आप चर्चेला सुरुवात झालेली असेल.तुम्हीसुद्धा चर्चेत सहभागी व्हा. विषया मधून विषय काढा. प्रयत्न करा कि सर्व विषय स्पष्टपणे समोर यावेत. चर्चा सूरु राहू द्या. जेव्हा तुम्हाला वाटेल कि चर्चा पुढे सरकत नाही आणि तेच-तेच विषय परत येत आहेत तर प्रश्न विचारा.)

**प्रश्नः मुलांबरोबर आपण हे काय करत आहोत?**
( **नोटः** वीडियो च्या सुरुवातीला (०:१२ वर) मुलाला जेव्हा विचारले जाते कि तो काय काम करतो . तर तो सांगतो कि भात खातो आणि खुर्सीवर बसतो.)

**प्रश्नः खुर्सी वर बसने आणि भात खाणे हे काही काम आहे का?**

**प्रश्नः तो असे का बोलला? का ह्यामुळे कि त्याच्याजवळ सांगण्यासाठी कोणतेही काम नाही आहे?**

( **नोटः** सहसा असे मानले जाते कि कामाचे हे विभाजन फक्त मुलींसाठीच ओझे आहे. तर काही यांच्याकडे दयाभावाने व बिचाऱ्या मुली इत्यादी भावनेने सुद्धा पाहतात. त्यांना मुलांच्या तुलनेने नाही बघितले जात. त्यामुळे तुम्हाला जेव्हा वाटेल कि चर्चेमधे काही नवीन विषय जुळून येत नाही तर त्वरित सराव घ्या.)

**सराव सामुग्री:** फळा, खडूआणिडस्टर.

**सराव:** समूहाला विचारा की मुलांचे या पद्धतीने संगोपन केल्याने काय-काय नुकसान आहे. दुसरे हे विचारा कि लहानपणी मुलांना जे विशेषाधिकार दिले जातात त्याचे काय-काय नुकसान आहेत. हे सर्व फळ्यावर लिहित जा. जवान मुलांचे ते कोणते चुकीचे दृष्टीकोन आणि प्रवृत्ती आहेत ज्या तुम्ही बालपणाला जोडून पाहत आहात. म्हणजे लहानपणी असे केले गेले म्हणून मोठा झाल्यावर असे झाले. यानंतर समूहात आपापसात चर्चा होऊ द्या.

( **नोटः** बालपण आणि मुलगा-मुलगीच्या संगोपणविषयी खूप चर्चा होईल. चर्चा परत कामाच्या विभाजनावर घेवून येण्यासाठी अजून एक त्वरित सराव घ्या.)

**सराव सामुग्री :** फळा, खडू आणि डस्टर.

**सराव:** फळ्यावर खडूने दोन भाग बनवा. एका भागात लिहा “मुलगी” आणि दुसऱ्या भागात “मुलगा” लिहा. समूहाला विचारा कि आपण मुलीला काय-काय काम शिकवतो आणि ते फळ्यावरील त्या भागात लिहित जा. त्यानंतर विचारा कि आपण मुलाला काय-काय काम शिकवतो आणि ते फळ्यावरील मुलाच्या भागात लिहित रहा. या पद्धतीने फळ्यावर दोन याद्या बनतील. फळ्यावर नजर टाका आणि पहा कि कोण जास्त गोष्टी शिकत आहे

आणि कोण कमी. दोघांच्या संगोपण आणि कामात कोणत्या पद्धतीच्या प्रवृती(कल) समोर येत आहेत. त्यानंतर समूहाला सांगा कि या सरावातून जे चित्र समोर येत आहे ते ध्यानात ठेवून स्वतासाठी ठरवा कि तुम्ही हे बदलण्यासाठी काय करू शकता. बदलाच्या ह्या प्रक्रियेला घरापासून सुरु करा.

( **नोटः** प्रत्येक सदस्याने आपल्यासाठी काही ना काही काम नक्की ठरवून घ्या. उदाहरणार्थ कुणी ठरवू शकते कि मुलाला किंवा मुलीला असे काम शिकवेल कि ज्यासाठी मनाई आहे.)

# विषयः **स्रीचे काम, पुरुषाचेकाम**

## उपविषयः **तोडधारणा, बदलदृष्टीकोन**

वीडियोः**विमलादेवीचा ढाबा** | **CC :संजयकुमारजैसवाल** | **UID: UP_1378**

**वीडियोचे वर्णन:** वीडियो सुरु होतो, एक महिला चहाच्या दुकानात सामोसे बनवत आहे. हे विचारल्यावर कि तुम्ही चहाचे दुकान चालवता तर तुमचे पती मना नाही करत का. ती सांगते कि एव्हडे सर्व केल्यानंतर आता काय मना करतील, पण भांडण करतात.CC विचारतो कि तुम्ही झगडा करता का? ती उत्तर देते कि मी का करू,तोच झगडा करतो. तेव्हा तुम्ही काय करता हे विचारल्यावर ती म्हणते आता काय बोलावे, गप्प रहावे लागते. पुढे सांगते कि १५ वर्षांपासून चहाचे दुकान चालवते, ६ लेकरेआहेत, ३ मुले आणि ३ मुली. सर्व शिक्षण घेत आहेत आणि पास झाले आहेत. पती मजुरी करतात. आपल्या दुकानाविषयी सांगते कि भजे बनवते, सामोसे बनवते, नमकीन बनवते. एकटी दुकान चालवते. खूप वेळा गर्दी वाढून जाते. कुणी भजे मागतो, कुणी चहा मागतो, कधी ग्लास धुणे आहे. दुकान चालवण्यात तुम्हाला लाज वाटते का असे विचारल्यावर ती म्हणाली आपले दुकान चालवायला कसली लाज. काम करू तेव्हा तर जेवायला मिळेल.

( **नोटः** समूहाला स्वता चर्चा सुरु करू द्या. कदाचित या विडीयो नंतर चर्चा आपोआप सहज सुरु होईल. होवू शकते कि कुणी म्हणेळ “खूप छान” यासारखे एखादे अर्धवट वाक्य. तर याच अर्धवट वाक्याला आधार बनवत चर्चा पुढे न्या. उदाहरणार्थ- विचारा कि काय छान वाटले, का वाटले इत्यादी. विषयामधून-विषय निघेल असे काही पूरक प्रश्न विचारु शकता.)

**पूरक प्रश्न :**

- **तुम्ही कधी अशा दुकानावर गेले आहत कि जे दुकान महिला चालवते?**
- **तुमची पहिली प्रतिक्रिया काय होती ?**
- **एक पुरुष चालवत असलेल्या दुकानात आणि एक महिला चालवत असलेल्या दुकानात काय अंतर आहे?**

( **नोटः** कदाचित रोजगार आणि लिंग च्या अवती-भोवती खूप चर्चा होतील. जेव्हा तुम्हाला वाटेल कि चर्चेची पुनरावृत्ती होत आहे आणि काही नवीन आकलन चर्चेमधे येत नाही आहे तर सराव घ्या)

**सराव सामुग्री:** एक फळा, खडू आणि डस्टर.

**सराव:** फळ्यावर खडूने चार भाग तयार करा. १.महिला कोणता रोजगार करू शकते. २. पुरुष कोणता रोजगार करू शकतो. ३. तो रोजगार जो महिला करू शकते परंतु करण्यास मनाई आहे. ४. तो रोजगार पुरुष करू शकतो परंतु करण्यास मनाई आहे. सर्व व्यवसाय आणि रोजगारांना दिल्या गेलेल्या श्रेणींच्या हिशोबाने सूचीबद्ध करायला सांगा. प्रयत्न करा कि कोणताही व्यवसाय सुटायला नको. त्यानंतर समूहाला आप-आपल्या दृष्टीकोनासाठी तर्क प्रस्तुत करायला सांगा.

( **नोटः** चर्चे दरम्यान पहा कि कोणत्या पद्धतीच्या प्रवृत्ती समोर येतात. विरोधाभास विषयाला पकडण्याचा प्रयत्न करा. उदाहरणार्थ- त्यांना विचारा कि एखादा खास रोजगार महिला किंवा पुरुष का करू शकत नाही. फळ्यावरील सूचीवर पहा कि असे किती रोजगार आहेत जे(महिला व पुरुष दोघांना) करण्यास मनाई आहे परंतु त्यांनी ती बंधने तोडली. असे किती व्यवसाय आहेत ज्याच्यात आजून बंधने तुटली नाहीत. चर्चा पुढे नेण्यासाठी पुरेशे प्रश्न विचारले जावू शकता.)

**पूरक प्रश्न :**

- **काय तुम्ही एखाद्या कष्टाळू महिलेला पहिले आहे?**
- **तुम्ही अशा परिवाराला ओळखता का,ज्याच्यात महिला कमवते आणि पुरुष घरातील काम करतो.?**
- **तुम्ही अशा परिवाराला ओळखता का ज्या परिवाराचे पालन-पोषण महिला करते?**
- **तुम्हाला असे वाटते का, कि महिलांनी आमच्या खूप साऱ्या धारणा(समझ) चुकीच्या ठरवल्या?**
- **तुमची अशी एखादी समझ जी खोटी ठरली असेल, ती सामायिक करा.(स्त्रीआणिपुरुषदोघांविषयी)**

( **नोटः** विशेषतः महिलांना खूप वाईट परिस्थितीत स्वताला सिद्ध करावे लागते. त्यांच्यासाठी संधी, परिस्थिती आणि संसाधन या तिघांची कमी आहे.त्यावूलात खूप विशेषाधिकार पुरुषांना वारसा मधे मिळाले आहेत. त्या महिलेची जगण्याची धडपड नक्की चिन्हित करा. चर्चा पुढे न्या आणि समूहाला प्रश्न विचारा.)

**प्रश्न:**

- तुम्ही अशा महिलांना ओळखता का कि त्यांनी लादलेली बंधने तोडली? म्हणजे असे काही काम केले आहे कि आतापर्यंतफक्त पुरुषच करत आले होते.
- एखाद्या पुरुषाला ओळखता का कि ज्याने लिंगभेदापासून मुक्त होवून, तथाकथित मर्दानगी सोडून, असा रोजगार किंवा व्यवसाय स्वीकारला असेल जो बनवलेल्या चालीरीतींना मोडत असेल. म्हणजेच पुरुषांसाठी हीन मानले जात असेल.

( **नोटः** जर समूह अशा व्यक्तींना ओळखत असेल तर, त्यांचे अनुभव मांडायला सांगा. जर समूहात अशी एखादी व्यक्ती आहे कि तिने लैंगिक रूढीनां तोडले आहे. तिचेही अनुभव ऐका. जर समूहात असी व्यक्ती असेल कि जिची

काहीतरी करण्याची इच्छा असेल, परंतु दबावामुळे नाही करू शकत तर समूहात तिची योजना बनवा. समूहाला प्रेरित करा कि एक असे उदाहरण प्रस्तुत करा कि जे बंधने तोडते. जर समूहाच्या बाहेर हि असी व्यक्ती असेल तर तिला ध्यानात ठेवा आणि तिचे समर्थन करण्यासाठी योजना बनवा.)

विषयः **स्रीचेकाम, पुरुषाचेकाम**

उपविषयः **तोड़बंधन,बदलदृष्टीकोन**

वीडियोः**सस्मिताएकआदर्श व्यक्तित्व** | CC :**दशरथीबेहरा** | **UID: OD_1182**

( **नोटः** वीडियोउड़ियाभाषेमधे आहे. उड़िसासाठी याचा उपयोग केला जावा.चर्चेचे संचालन या सरावातून करा.)

**सरावासाठी सामुग्री:** एकवही आणि पेन.

**सराव:** समूहाला त्यांची ओळख किंवा व्यवसायाची नावे सांगायला लावा. जसे- दुकानदार, आशा वर्कर, विद्यार्थी, पत्नी, शेतमजूर, गृहिणी, मुलगी, ड्राइवर,वैज्ञानिक, शिक्षकइत्यादी. हा सराव जास्त वेळ घेवू नये. समूहाला लवकर-लवकर सांगायला लावा आणि तुम्ही यादी बनवत रहा. समूहाला सांगा कि कोणतीही ओळख किंवा व्यवसाय सुटणार नाही याचा प्रयत्न करा. त्यानंतर बनवलेली यादी समूहाला वाचून दाखवा.

( **नोटः** कदाचित यादीमध्ये सामाजिक कार्यकर्ता हा शब्द मिळणार नाही. कारण कि समाजामध्ये सामाजिक कार्यकर्तासाठी खोकळी प्रोत्साहने तर खूप आहेत पण आपल्या संवेदनशीलतेचा भाग नाही झाले, कि हो हे पण असतात. जर सामजिक कार्यकर्ता यादी मधे आला असेल तर या गोष्टीकडे ध्यान द्या कि तो केंव्हा आला. होवू शकते कि कुणी शेवटी बोलेल. सामाजिक कार्यकर्त्याविषयी समाजात काय समझ आहे या विषयाचा आस-पास चर्चेचे संचालन करा. जेव्हा वाटेल कि आता चर्चा पुढे जात नाही आहे तर समूहाला सांगा कि आपण दुसरा विडीयो पाहूया.)

**वीडियोचे वर्णन:** वीडियो सुरु होतो.स्क्रीनवर गावाचे चित्र दिसतात बरोबरच आवाज ऐकू येत आहे कि “आपल्या समाजात महिला लिंगभेद च्या शिकार होतात. स्वातंत्राच्या ६९ वर्षानंतरही स्रियांना दुय्यम दर्जा दिला जातो आणि कमी लेखले जाते. हे एका मुलीच्या जन्मताच सुरु होऊन जाते. तिचे सुख हिरावून घेतले जाते. परंतु संबलपुर जिल्ह्यापासून ३५ किमी दूर, डोंगर व जंगलाने वेढलेल्या चामुंडा नावाच्या छोट्याशा गावातील सस्मितासाहूने ह्या वास्तवाच्या उलट करून दाखवले आहे. ती परिवाराच्या अरुंद चार भिंतींच्या बाहेर पडली. गावाती लहान मुले आणि किशोरवयीन मुलांना योग्य मार्ग दाखवण्यासाठी त्यांना शिक्षित करण्याच्या स्वप्नाला पूर्ण करू लागली. सस्मित सांगते कि “मुख्यता मी बालक आणि किशोर यांच्याबरोबर काम करते. सध्या माझ्या समूहात ३५ बालक आणि

किशोर आहेत. मी गावात विविध समाजिक विषयांवर कार्यक्रम आयोजित करीत असते. नृत्य, अभिनयवगायनइत्यादी सांस्कृतिक कार्यक्रम सुद्धा करते. आम्ही आमच्या गावात स्वच्छतेचे काम केले आहे आणि रस्ता व गल्ल्या समतोल करण्याचेही काम केले आहे". गावातील एक मुलगी सांगते कि सस्मिता गावातील विविध मुद्यांवरअभियान आणि बैठका आयोजित करीत असते त्यात गावातील युवा तिला मदत करीत असतात. आम्ही सर्व मिळून काम करतो. सास्मिताची आई सांगते कि पहिले सस्मिता एव्हढी दक्ष नव्हती पण आता खूप शिकत आहे आणि चांगले काम करीत आहे. ती वरिष्ठव्यक्तींबरोबर सुद्धा आत्मविश्वासाने बात करू शकते. लोकांना सल्ला देते आणि लोकही तिची स्थुती करतात. सर्व पालकांनी तिचा आत्मविश्वास वाढवला पाहिजे. ती परिवाराचे नाव उज्वल करेल. सास्मिताचे स्वप्न आहे कि सर्वांनी सोबत येवून या कार्याला पुढे न्यावे.ती गावातील इतर मुलींच्या विचारात सकारात्मक बदल घडवण्यात यशस्वी होऊ शकली आहे.

( **नोटः** वीडियोनंतर चर्चा आरामात सुरु होईल. समुहालाच चर्चा सुरु करू द्या. कदाचित सस्मिता आणि सामाजिक कार्य याच्या आसपास चर्चा होईल. मुलीच्या मनोधैर्याला शाबासी देतील किंवा तिची प्रशंसा करतील. एकदा त्याच गोष्टींच्या आसपास चर्चा घडवा ज्या समूहाच्या चर्चेतून येत आहेत. चर्चा पुढे जात नसेल तर प्रश्न विचारा.)
चर्चा पुढे नेण्यासाठी काही प्रश्न-

**प्रश्न: काय आपला समाज मुलींचे नेतृत्व स्वीकार करतो?**

**प्रश्न: काय सस्मितासारख्या एखाद्या मुली किंवा महिलेला ओळखता, जिने समाजाची बंधने तोडली आहेत?**

( **नोटः** कारण कि पुरुषप्रधान समाजात "महापुरुष" च संवेदनशील आहे. स्त्रियांना पालनकर्ताच्यारूपातच पहिले जाते. वयानुसारही काही विरोधाभास होतात. कारण आपल्याकडे मुलींना "व्यक्ती" म्हणून बघण्या ऐवजी "गुडिया" किंवा "बाहुली" प्रमाणे बघण्याची सवय आहे आणि पुरुष संरक्षक किंवा उद्धारकर्ता च्या भूमिकेत राहतात. या विचारांच्या आस-पास चर्चा घडवत रहा.) काही ह्या पद्धतीचे पूरक प्रश्न हि विचारू शकता-

**पूरकप्रश्न: महापुरुष चा विरुद्ध शब्द सांगा?**

( **नोटः** कारण कि हे विचारातच नाही आहे कि महिला सुद्धा महान असू शकतात. काय फक्त पुरुषच महान असू शकता का. काय अशा महिलाच नव्हत्या कि त्यांना पाहून असे वाटेल कि या महान आहेत. काय पुरुष अधिक प्रमाणात मोठ्या संखेने महान होते. या पद्धतीने मनोरंजक पणे चर्चेला पुढे नेता येवू शकते. एका मुलीसाठी व्यक्ती म्हणून स्थापित करायला काय अडचणी आहेत, याच्या आस-पासशोधप्रक्रिया करा.)

**पूरकप्रश्न:**

- **काय आपण निर्णय घेतांना स्त्रियांचा किंवा खासकरून मुलींचा सल्ला घेतो?**

- **काय खरच मुली बाहेरच्या जगाविषयी कमी जाणता ?**
- **जर एखादी मुलगी राष्ट्रीय किंवा विविध सामाजिक मुद्यांवर आपले विचार मांडत असेल तर आपली प्रतिक्रिया काय असते?**

( **नोटः** मुलींच्या बौद्धिक क्षमतेविषयी खूप काही चुकीच्या समजुती समाजात आहेत. स्त्रियांविषयी हे हि सांगितले जाते कि तुम्हाला काय माहित बाहेरच्या जगाचे. पुरुषांसाठी सामाजिक जीवन (व्यवसाया व्यतिरिक्त)सहजउपलब्ध आहे. परंतु मुलींना सामाजिक जीवन प्रतिबंधित आहे. या विरोधाभासांच्या आस-पास चर्चा घडवा.) जेव्हा तुम्हाला वाटेल कि चर्चा पुढे जात नाही तर पुन्हा विडीयो दाखवा आणि हा सराव घ्या-

**सराव सामुग्री :**एककाळा फळा, खडू आणि डस्टर.

**सराव :** फळ्यावर खडूने तीन भाग करा. १.व्यक्तिगत, २.पारिवारिक, ३.सामाजिक. समूहाला सांगा कि मुलींना पुढे जातांना आणि सामाजिक कार्य करण्यात कोणत्या अडचणी येतात त्या वर्गवारी करून वेगवेगळ्या भागात लिहा. त्यानंतर विचारा कि या अडचणी कशा दूर होतील. काय एखादी अशी समस्या आहे जी सुटू नाही शकणार. यामधील किती समस्यांचे आपण शिकार आहोत. आपण या अडचणींना दूर करण्यासाठी काय करू शकतो.

विषयः **घरातपितृसत्ता**

उपविषयः **पुरुषाचे वर्चस्व,महिलाचे शोषण**

वीडियोः**नाव नका घेवू...कारण पतिभगवानआहे** | **CC :माधुरीचौहान** | **UID: UP_1548**

**वीडियोचे वर्णन:** वीडियो सुरु होतो. एक महिला सांगते कि भारतीय स्री पतीचे नाव घेत नाही. त्यानंतर एक-एक करून अजून ४ महिला सांगता कि आम्ही आमच्या पतीचे नाव नाही घेत. कारण विचारल्यावर सांगता कि पती परमेश्वर असतो, तो देवता समान असतो, असा रिवाज नाही आहे. सांगता कि पती पत्नीचे नाव घेवून बोलवू शकतो. कारण पती परमेश्वर असतो आणि महिला पतीपेक्षा लहान आहे. त्याला नाव घेण्याचा अधिकार आहे. तो मर्द आहे ना, मायबाप आहे, त्यामुळे नाव घेवू शकतो.

(**नोट**ः छोटा विडीयो आहे त्यामुळे जर तुम्हाला वाटत असेल कि पुन्हा बघावा तर पूर्ण विडीयो पुन्हा बघा.) त्यानंतर लगेच हा सराव घ्या-

**सराव:** समूहाला विचारा कि काय आपण सुद्धा असे करतो? पुरुषांना विचारा कि काय तुमच्या पत्नी तुमचे नाव घेतात? जर समूहात अविवाहित व्यक्तीही असला तरी त्यांना त्यांच्या आई-वडिलांबद्दल, इतर नातेवाईक किंवा शेजारींविषयी विचारले जाऊ शकते. जर स्वताविषयी सांगायला झिजकत असेल तर आजूबाजूच्या विषयी विचारु शकता. याचे उत्तर हो किंवा नाही मधे मिळेल. यानंतर विचारा कि काय हे तुम्हाला योग्य वाटते. कदाचित याचेही उत्तर हो किंवा नाही मधे येतील. जर वेगवेगळे विचार आले तर चर्चा घडवा. त्यानंतर हे प्रश्न विचाराः-

**प्रश्न: जर तुम्ही याला चुकीचे मानता तर असे का करत आहात?**

(**नोट**ःया विरोधाभासाला समजण्याचा प्रयत्न करा कि कोणती गोष्ट आहे जी असे करायला भाग पाडते. आणि ते त्याबद्दल काय विचार करता. पतीचे नाव नघेण्यामागचे कारण आहे कि श्रेष्ठ-कनिष्ठ दर्जा कायम ठेवणे. म्हणजे दैनंदिन जीवनात याचा सराव होत राहावा कि कोण छोटे आहे आणि कोण मोठे.) खोलात जाणून घेण्यासाठी काही प्रश्न ह्याप्रकारे विचारले जाऊ शकता-

**पूरकप्रश्न: काय आपल्याला विचित्र नाही वाटत कि तुमची पत्नी तुमचे नाव नाही घेत?**

- **काय खरच पती भगवान आहे? तर पत्नी काय आहे?**

- **समजा जर सामाजिक म्हणून एखादी महिला तिच्या पतीचे नाव घेईल तर काय होईल? कोणता डोंगर कोसळून येईल?**
- **तुम्ही कधी तुमच्या पतीचे नाव घेतले आहे काय?**
- **काय तुम्ही अशा दांपत्यास ओळखता जे एकमेकांना नावाने बोलवता?**
- **अशी कोणती परंपरा किंवा मर्यादा आहे जी पतीचे नाव घेताच उध्वस्त होईल?**
- **काय तुम्ही याविषयी विचार केला किंवा तुम्हाला असे वाटलेच नाही कि काही चुकीचे होत आहे?**

(**नोटः**सहसा पितृसत्ता दैनंदिन जीवनाचा भाग असते. ती स्वाभाविक आणि प्राकृतिक वाटू लागते. आम्हाला वाटतच नाही कि काही चुकीचे घडत आहे. चर्चेमधे समूहाची मदत करा कि ते हे समजू शकतील कि खूप काही छोट्या किंवा स्वाभाविक वाटणाऱ्या गोष्टी खरोखर छोट्या नसतात. जेव्हा तुम्हाला वाटेल कि चर्चा पुढे जात नाही तर सराव घ्या.)

**सराव** सामुग्री: काळा फळा, खडू आणि डस्टर.

**सराव:** काळ्या फळ्यावर खडूने २ भाग बनवा.एकावर लिहा “भारतीय मर्द” आणि दुसर्या भागात “भारतीय नारी” लिहा. समूहाला विचारा कि त्यांनी दैनंदिन जीवनात काय-काय करायला पाहिजे आणि काय नाही.तुम्ही ते फळ्यावर लिहित जा. त्यानंतर वर्तन आणि आपसी विरोधाभासावर चर्चा घ्या.समूहातील सर्व सदस्यांना आपले तर्क आणि टिप्पण्या करायला सांगा.

(**नोटः** ध्यानात असुद्या कि विडीयो च्या सुरुवातीला महिलाने सांगितले कि भारतीय नारी("हिंदुस्तानीऔरत" ) आपल्या पतीचे नाव नाही घेवू शकत. भारतीय नारी ("हिन्दुस्तानीऔरत") समाजाद्वारे महिलासाठी मढवलेला साचा आहे. याचप्रमाणे पुरुषासाठी सुद्धा साचा आहे. आपल्याला त्या वर्तनावर आपले सराव केंद्रित करायचे आहेत जिथे महिला व पुरुष दोघे एक-दुसऱ्यावर केंद्रित असतात. उदाहरनार्थ- पुरुष मुलाबाळांना प्रेम नाही करणार. जर कुठे जायचे असले तर पुढे-पुढे चालणार. परीवारासमोर दोघे एका खाटेवर नाही बसू शकत. या सरावात हे शोधा कि साचा मधे जकडलेलेस्री-पुरुष एकमेकांबरोबर कसे वर्तन करतात. या वर्तनांवर चर्चा घडवा. मग हे विचारा कि यातले किती वर्तन चुकीचे आहेत आणि ते आपण करतो. हे वर्तन सोडायला समूहाला प्रेरित करा. चर्चा पूर्ण करण्यासाठी एक पूरक सराव घ्या)

**पूरकसराव:** समूहातील सदस्यांना सांगा कि त्यांनी आपल्या पती-पत्नीच्या नावाचे उच्चारण करावे. पूर्ण समूहाणनेसोबतच बोलायचे आहे कुणाचे ऐकायचे नाही फक्त आपले बोलत राहायचे. सर्वांचे डोळेही बंद करायला सांगू शकता. पति-पत्नीचे नाव, प्रेम, शरम, राग, खोडी इत्यादी भावातू बोलायला सांगा. मग

सांगा कि आता दोघांच्या नावाचे उच्चारण करा. याला एका खेळाप्रमाणे करा. यानंतर या वाक्याला पुन्हा बोलायला सांगा- माझे नाव....आहे, माझ्या जीवनसाथी चे नाव...आहे, मी...आणि...जीवनसाथी आहोत.

(**नोटः** यानंतर सर्व सदस्यांना सांगा कि त्यांनी आपले आणि आपल्या जीवनसाथीचे नाव उच्चारून-उच्चारून फळ्यावर लिहावे. समूहातील अविवाहित सदस्यांबरोबर हा सराव त्यांच्या आई-वडील, भाऊ-वहिनी इत्यादी चे नावाबरोबर केला जावू शकतो.)

विषयः **कौटुंबिक हिंसा**

उपविषयः **पुरुषाचे वर्चस्व,महिलावर बंधन**

---

वीडियोः**पति-पत्निच्या संबंधात ताकत व हिंसा| CC :शबनमबेग़म | UID:** UP_1340

---

**वीडियोचे वर्णन:** वीडियो मधे तुम्ही बघाल कि महिला घरातील कामाव्यतिरिक्त पतीचे बूट साफ करणे, पाय चेपणे इ. काम सुद्धा करत आहे. पती परत-परत तिच्या डोक्यावर मारत आहे. एका गर्भवती महिलेवर राग काढला जात आहे. पती परत बायकोच्या डोक्यावर हळुवार मारतो. जेव्हा त्याला महिला अत्याचारा बद्दल विचारले जाते तेव्हा म्हणतो..म्हणजे काय? महिलेला सुद्धा मान्य आहे कि तो पती आहे म्हणून त्याला रागावण्याचा अधिकार आहे. पुरुष म्हणतो कि पुरुष श्रेष्ठ आहे. महिलेला ह्याच पद्धतीने रहावे लागेल. महिला सांगते कि चुका तर पुरुषापासुनही होतात पण आम्ही बोलू नाही शकत, कारण तो पती आहे.महिला म्हणते कि माझ्या भावाला कुठेही येण्या-जाण्याची मुभा होती परंतु आम्हाला घरातून बाहेर जाण्यास बंदी होती कारण आम्ही घरची इज्जत होतो. परुष म्हणतो महिला अनपड आहे, शिकलेली नाही. त्यामुळे ती घरातील काम करते आणि पुरुष बाहेरचे काम करतो. शेवटी ती म्हणते आम्हालाही बाहेर पडायचे आहे,आमचीपण इच्छा होते. जर आता हि संधी दिली तर सर्वात अगोदर आम्ही शिक्षण घेवू.

( **नोट :** मुसलमानांमध्ये असे होते यासारख्या गोष्टी चर्चेत येऊ शकतील कारण मुस्लीम परिवारावर विडीयो बनवला गेला आहे. लक्षात ठेवा कि चर्चा जेन्डर विषया नुसार व्हावी, कारण हा मुद्दा फक्त मुस्लीम धर्मापर्यंतच मर्यादित नाही. महिलांवर होणाऱ्या अत्याचाराची मोठ्या प्रमाणात स्वीकारार्हता आहे.)

**चर्चाकशी सुरु कराल :** वीडियो दाखवायला सुरुवात करा. संपल्यानंतर तुम्ही काहीही बोलू नका, तुम्ही चर्चेचा पुढाकार घेऊ नका. जर समूहातील कुणी बात करायला सुरु करत असेल तर ठीक आहे. जर कुणी बोलत नसेल विडीयो पुन्हा सुरुवातीपासून लावा आणि ०:२६ वर थांबवा जिथे पती त्याच्या पत्नीच्या डोक्यावर मारत आहे. आणि हा सराव घ्या :-

**सराव:** समूहाला विचारा कि हे काय होते? काय हे प्रेम होते? ज्याला वाटते प्रेम आहे त्यांना हात वर करायला सांगा. नंतर ज्यांना वाटते कि अत्याचार होता त्यांना हात वर कायला सांगा. ज्यांना वाटते कि काही विशेष गोष्ट नव्हती त्यांना हात वर करायला सांगा. याच प्रमाणे ज्यांना वाटते कि पती-पत्नीचे प्रेम होते त्यांना हात वरती करायला सांगा. आता सर्वांना आपापल्या दृष्टिकोनासाठी युक्तिवाद सदर करायला सांगा.

( **नोट :** शारीरिकहिंसा, मानसिकहिंसा, यौनहिंसा, आर्थिकहिंसा, शाब्दिकहिंसाम्हणजे टोचून बोलणे इत्यादी सर्व विषयांचा चर्चेमधे समावेश करा. थोडा वेळ चर्चा चालल्यानंतर जेव्हा तुम्हाला वाटेल कि चर्चेची पुनरावृत्ती आहे किंवा चर्चा पुढे नाही जात आहे तर विडीयो सुरुकारा जेथून तुम्ही आधी थांबवला होता, आणि १:३० वर थांबवा जिथे महिला म्हणते कि पतीला काही सांगण्यासाठी माझा काय अधिकार बनतो.) हा सराव घ्या:-

**सरावासाठी साहित्य:** एक फळा, खडू आणि डस्टर.

**सराव:** खडूने फळ्यावर दोन भाग बनवा. एकावर लिहा “नवऱ्याचा बायकोवर अधिकार” आणि दुसऱ्यावर लिहा “बायकोचा नवऱ्यावर अधिकार’. समूहाला ते आचरण लिहायला सांगा कि कोणकोणत्या गोष्टींमधे पती-पत्नीचे एकमेकांवर अधिकार आहेत. मग यावर चर्चा घडवा.

( **नोट**ः पुरुषांच्या दृष्टीने हाताळा, मोकळेपणाने बोलू द्या. या गोष्टीचे ध्यान ठेवा कि कौटुंबिक हिंसेला महिलांनाच दोषी ना ठरवले जावे. या प्रकारे सुद्धा पाहिले जाऊ शकते कि दोघांमध्ये कोण जास्त स्वातंत्र्य आहे किंवा कोण निर्णय घेतो. जेव्हा तुम्हाला वाटेल कि चर्चा पुढे जात नाही आहे तर विडीयो तेथूनच सुरु करा जिथे थांबवला होता आणि २:२१ वर थांबवा जिथे महिला म्हणते कि लग्नानंतर आता मी सासरची इज्जत झाली आहे. ते पण कुठे बाहेर येवू-जावू देत नाहीत. प्रश्न विचारा.)

**प्रश्न: पुरुषाची इज्जत काय आहे आणि महिलाची इज्जत काय आहे?**
( **नोट**ः या प्रश्नाद्वारे इज्जत विषयी जी मते आहेत ती चर्चेमधे आणण्याचे प्रयत्न करा.) काही ह्याप्रकारे प्रश्न विचारले जाऊ शकतात:-

- **खऱ्या इज्जतीचे महत्व काय आहे आणि नकली इज्जतीचे काय?**
- **इज्जत वाचवायचा सर्व भार मुलींवरच का?**
- **हि इज्जत आहे का स्त्रियांसाठी आचारसंहिता आहे?**

विचारपूर्वक चर्चेचे सूत्रसंचालन करा व जेंव्हा तुम्हाला वाटेल कि विषयाची पुनरावृत्ती होत आहे आणि काही नवीन परिमाण समोर येत नसेल तर विडीयो सुरु करा जिथे आधी थांबला होता व ४:३२ वर थांबवा जिथे स्क्रीनवर लिहिलेले आहे- DISMANTLE PATRIARCHY. नंतर समूहाला प्रश्न विचारा:-

**प्रश्न: तुमच्या मते पती-पत्नीचा आदर्श नातेसंबंध काय आहे आणि कसा असला पाहिजे? यांना तुम्ही काय सल्ला देवू इच्छिता, महिलालाही आणि पुरुषालाही?**

( **नोटः** प्रयत्न करा कि चर्चेनंतर लोकांमध्ये एक चांगला, संवेदनशील, उत्तरदायी, लोकशाही संबंध विकाशित करण्याची इच्छा तयार होईल. सोबतच हेही सांगा कि कौटुंबिक हिंसा हा कायद्याने गुन्हा आहे. हा फक्त पती-पत्नी च्या मधला विषय नाही. जर शक्य झाल्यास कायद्याची माहिती असलेले एकपानी वाटप केले जावे.)
शेवटी विडीयो पुन्हा पाहू शकता आणि सर्वांना धन्यवाद द्या.

विषयः **मासिक पाळी**

उपविषयः **पहिली मासिक पाळी**

---

वीडियोः**पहिली मासिक पाळी:कलंक आणि चुप्पी** | **CC :उषापटेल** | **UID:** UP_1396

---

**वीडियोचे वर्णन:** एल युवती सांगते कि जेव्हा मला पहिली मासिक पाळी आली तेव्हा मी खूप घाबरले होते. त्यानंतर दोन विवाहित महिला त्यांचा पहिल्या मासिक पाळीचा अनुभव सांगतात कि जे काही होत होते ते खूप खराब वाटत होते, प्रत्येक ठिकाणी सगळ्यांशी चोरून रहावे रहावे लागत होते. त्यावेळी माझ्या मनात खूप गुंतागुंतीचे विचार येत होते कि हे काय आणि का होत आहे. मी खूप अस्वस्थ होते. एक वयस्कर महिला आपला अनुभव सांगते कि खूप दुखायचे, कंबर दुखायची, पोट दुखत होते. जीव धडधडायचा कि हे मला काय होत आहे. युवती सांगते कि ती जेव्हा आठव्या वर्गात शिकत होती तेव्हा तिला तिच्या मैत्रिणीने याबद्दल सांगितले होते. सांगितले जाते कि आता तू मोठी झाली आहे, हे नको करू ते नको करू,तिला चांगल्या वाईट ची ओळख सागितली जाते. मला सांगितले गेले कि आता तू मोठी झाली आहेस, काही असे काम नको करूस ज्यामुळे परिवार....महिला सांगते कि पूजा पाठात नाही जाऊ दिले जात. मुलगी सांगते कि असे मला सांगितले गेले कि मंदिरात जायचे नाही आणि स्वयंपाकघरात घुसायचे नाही. वृद्ध महिला सांगते कि एखादे चांगले काम जे शुभ मानले जाते त्यात सहभाग नाही घेऊ शकत, कारण शरीर अशुद्ध असते.

